# फिलिप्प रथात बसला आणि येशूविषयी सांगितले

## मुलांना येशूची सुवार्ता सांगण्याविषयी शिकवा

मुलांच्या गरजांनुसार कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

शक्य असल्यास मुलांना बाजूचे चित्र काढायला सांगा.



**मोठया मुलाने किंवा शिक्षकांनी प्रे.कृ.** 8:26-40 मधून फिलिप्प व हबशी षंढ ह्यांचा कथावृत्तांत वाचून दाखववा. पवित्र आत्म्याने ख्रिस्ताची सुवार्ता रथातील माणसास सांगण्यासाठी फिलिप्पला कसे साहाय्य केले ते येथे सांगितले आहे. हा माणूस हबशी (इथिओपियातील) होता आणि प्रथम त्याला शास्त्रलेख समजला नाहीं.

प्रे.कृ. 8:26-40 मधून कथावृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा. *(प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिलेले आहे).*

- फिलिप्पला ओसाड वाटेकडे जाण्यास कोणी सांगितले *(पाहा वचन 26)*
- रथ जाऊन गाठ ही आत्म्याची आज्ञा फिलिप्पने किती लवकर पाळली? *(30)*
- तो हबशी माणूस काय वाचत होता? *(पाहा वचन 30, तो शेकडो वर्षांपूवी होऊन गेलेल्या यशया संदेष्टयाचा ग्रंथ वाचत होता, यशया 5:3)*
- ह्या भविष्य संदेशामध्ये शास्त्रलेख कोणाविषयी बोलत आहेत? *(पाहा. प्रे.कृ. 8:32, यात येशूविषयी सांगितले आहे, तो वधावयास नेत असलेल्या मेंढरासारखा मरण पावला).*
- फिलिप्पने हबशी माणसाचा बाप्तिस्मा कधी केला? *(पाहा वचन 38).*

फिलिप्प व हबशी ह्यांच्या कथावृत्तांताचे **नाट्यीकरण करा.**

- ही छोटीशी नाटिका मुलांना सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढ्रायांशी बोलून व्यवस्था करा. मुलांकडून तयारी करुन घ्या.
- **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात.

**निवेदक.** कथावृत्तांताचा सारांश करुन मुलांना संवाद पाठ करायला मदत करा.

**फिलिप्प**



**लहान मुलांनी** पुढील भूमिका कराव्यात.

**हबशी माणूस**

**घोडे** (एक किंवा दोन)

**वाणी** (देवाचा आत्मा)

**निवेदक :** प्रे.कृ. 8:26-35 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा ''प्रभूचा दूत फिलिप्पला काय सांगतो ते ऐका.''

**वाणि :** ''फिलिप्प, त्या ओसाड रस्त्याकडे जा. तिथे तुला एक रथ दिसत आहे ना? त्याच्याजवळ जा.''

**घोडे :** दोन खुर्च्या रथ आहेत असे समजून त्यांच्यापुढे उभे राहा. घोडयांसारखे चालण्याचा अभिनय करा.

**हबशी माणूस ( एका खुर्चीवर बसा )** यशया 53:7-8 वाचा. म्हणा, ''हे लिहिलेले काही मला समजत नाही. हा कोकरा कोण आहे?''

**फिलिप्प :** ''मी समजावून सांगतो,'' (दुसया खुर्चीवर बसा). ''ही प्राचीन भविष्यवाणी येशूसंबंधी असून तो एखाद्या कोकराप्रमाणे आमच्याकरीता मरण पावला.''

**निवेदक:** प्रे.कृ. 8:36-40 मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''हबशी माणूस काय म्हणतो ते ऐका''

**हबशी माणूस :** ''पाहा येथे पाणी आहे! मला बाप्तिस्मा घेण्यास काय हरकत आहे?''

**फिलिप्प :** ''तू मनापासून, अंत:करणपूर्वक येशूवर विश्वास असेल तर मग तुझा बाप्तिस्मा होण्यास हरकत नाही.''

**हबशी माणूस :** ''घोडयांनो थांबा!''

**घोडे :** घोडयाच्या खिंकाळण्याचा आवाज काढा. घोडयाप्रमाणे पाय उंच करुन हवेत दौड मारल्याचा अभिनय करा.

**फिलिप्प :** (हबशी माणसाबरोबर चाला आणि त्याचा बाप्तिस्मा करीत असल्याचा अभिनय करा. मग पळून जाऊन लपून बसा).

**हबशी माणूस :** ''अरे, तो माणूस कोठे गेला? त्याने माझा बाप्तिस्मा केला आणि अदृश्य झाला!''

**निवेदक किंवा मोठे मूल :** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

मुलांनी ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण प्रौढांसाठी केले असेल तर, मग...

- वर दिलेले प्रश्न त्यांनी मोठया माणसांना विचारावेत.
- मोठया मुलाला प्रौढांना प्रश्न विचारता येईल, ''आणखी कोणत्या मार्गांनी लोकांना येशूविषयी सांगण्याची प्रेरणा पवित्र आत्मा आपल्याला देतो?
- लोकांना उदाहरणे देऊ द्या.

वाळवंटातील रस्त्याचे पुढील प्रमाणे **चित्र काढा.**



- मुलांनी हे चित्र काढून आपल्या आईवडीलांना आणि पुढच्या उपासनेच्यावेळी मोठया माणसांना दाखवावे.
- मग त्यांना घोडे दोन माणसे बसलेला रथ ओढत असल्याचे चित्र काढायला सांगा.
- मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.

**पाठ करा योहान 3:16**

**कविता :** यशया 53:6-8 यातून प्रत्येकी एकेक वचन तीन मुलांना म्हणायला सांगा.

काही मोठया मुलांना फिलिप्प विषयी कविता अथवा गीत लिहावेसे वाटेल.

**प्रार्थना :** ''प्रिय पित्या, तुझा आत्मा आम्हांला प्रेरणा देईल तेव्हा त्याप्रमाणे करण्याची आमची इच्छा आहे. सुवार्ता ऐकण्यास तयार असणाऱ्या लोकांकडे आम्हांला ने. तुझा पुत्र येशू विषयी त्यांना सांगण्यासाठी पवित्र शास्त्रातील गोष्टी आमच्या लक्षात राहू देत. तू केलेल्या अद्‌भुत गोष्टी प्रत्येकाला माहित करुन देण्याची आमची इच्छा आहे''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net